## महाराष्ट्र वन विभाग निसर्गाच्या विविधतेने नटलेल्या भूमीवर

## आपले सहर्ष स्वागत करीत आहे.

महाराष्ट्राच्या एकूण भौगोलिक ३०७७१३ चौ. कि.मी. क्षेत्रापैकी ६१९१६ चौ. कि.मी. वनक्षेत्र आहे. जे एकूण भौगोलिक क्षेत्राच्या २०.१२ टक्के आहे. यामध्ये प्रामुख्याने दक्षिण उष्ण कटिबंधीय पानगळीची 'शुष्क वने' व 'दमट वने', पश्चिमेकडील पर्वतरांगांच्या माथ्यावरील 'दक्षिण उष्ण कटिबंधीय समशीतोष्ण रुंदपर्णी पर्वतीय वने' तर याच पर्वतरांगांच्या उतारावरील दक्षिण उष्ण कटिबंधीय सदाहरित वने, कमी पर्जन्यामूळे निर्माण झालेले दक्षिण उष्ण कटिबंधीय काटेरी वने आणि पश्चिम सागरी किनाऱ्यावरील 'सागरी किनारी आणि भरती ओहोटीची दलदली वने' इत्यादी विविध प्रकारच्या वनांमुळे वनस्पती व वन्यप्राण्यांची दुर्मिळ विविधता याच राज्यात दिसून येते.

भारतीय वन सर्वेक्षण संस्था, देहरादून ने सुदूर संवेदन उपग्रहाच्या मदतीने प्राप्त केलेल्या माहितीच्या आधारे प्रसिध्द केलेल्या वनस्थिती अहवाल २००१ नुसार महाराष्ट्रात वृक्षाच्छदनाने ४७४८२ चौ. कि.मी. क्षेत्र व्यापलेले असून त्यामध्ये सन १९९७ पासून सतत वाढ होत असल्याचे दिसून आले आहे.

जैविक विविधतेने समृध्द असलेल्या महाराष्ट्र राज्यात विविध पशुपक्षी, वनस्पती आढळतात. यामध्ये ३५०० प्रजातीच्या फुलांनी बहरणारी वृक्षवल्ली, ८५ प्रकाराची सस्तन प्राणी तर ४६० प्रकारचे पक्षी आहेत. साग, शिशम , हळदू, बीजा, कळम, सेमल, बेहडा, हिरडा, खैर, डिकामली, सालई, रोहन, मोहा, ऐन, तिवस इत्यादी प्रमुख वृक्ष प्रजाती तसेच चितळ, सांबर, निलगाय, रानगवा, कोल्हा, तडस,रानकुत्रा, अस्वल, बिबटे, वाघ इत्यादी वन्यप्राणी प्रामुख्याने आढळून येतात. संरक्षित वन क्षेत्रात तृणभक्षी व मांसभक्षी प्राण्यांची दरवर्षी तर इतर वनक्षेत्रात दर चार वर्षानी गणना होत असते. या गणनेनुसार वाघ व बिबटयाच्या संख्येत तसेच तृणभक्षी प्राण्यांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याचे आढळून आलेले आहे. अशा जैविक विविधतेने समृध्द असलेल्या भौगोलिक क्षेत्राचे जतन करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात पाच राष्ट्रीय उद्याने ३५ अभयारण्ये तर यातील मेळघाट, ताडोबा व पेंच ही तीन संरक्षित क्षेत्रे 'व्याघ्र प्रकल्प क्षेत्र' म्हणून घोषित करण्यांत आलेली आहेत.

महाराष्ट्र राज्याला विविध वृक्षवल्ली व वन्यप्राण्यांच्या स्वरुपात निसर्गाने देणगी दिलेली आहे. या जैविक विविधतेचे जतन करणे, तिचे महत्व पटवून देणे व वन्यजीवांबाबत आपुलकी व बांधिलकी निर्माण करण्यासाठी वन विभाग वन पर्यटनास प्रोत्साहन देत असते. निसर्गप्रेमींसाठी वन विभागाने २४ निसर्ग निर्वचन केंन्द्र स्थापन केलेली आहेत. महाराष्ट्रातील वन पर्यटनाचे काही महत्वाचे ठिकाणे-

| | |
|---|---|
| १. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली | ५. पेंच राष्ट्रीय उद्यान, |
| २. ताडोबा राष्ट्रीय उद्यान, चंद्रपूर | ६. आलापल्लीचे वैभव |

| | |
|---|---|
| ३. नवेगांव राष्ट्रीय उद्यान, गोंदिया | ७. कळसूबाई हरीशचंद्र गड, अहमदनगर |
| ४. गुगामल राष्ट्रीय उद्यान, अमरावती | ८. माथेरान रायगड |

विविध वृक्ष प्रजाती, वन्यप्राणी तसेच सर्वच जैविक विविधता व्यवस्थापनाची जबाबदारी वन विभाग पार पाडीत असते. महाराष्ट्र वन विभागाला इतिहासाचा वैभवशाली वारसा प्राप्त झालेला आहे. राज्यात सन १८०५ पासूनच खऱ्या अर्थाने वन संवर्धनाचे व्यवस्थापन अंमलात येत आहे. यानंतर सन १८४२ मध्ये प्रथमतः पुणे येथे वनसंरक्षकाचे कार्यालय उघडण्यात आले. तर सन १८६५ ला वनांच्या संरक्षण व संवर्धनासाठी सूचना (Charter) प्रख्यापित करण्यात आलेल्या होत्या.

वनांच्या शास्त्रोक्त व्यवस्थापनाकरिता कार्य-आयोजना तयार करण्यात येतात. महाराष्ट्र राज्यात शास्त्रोक्त वन व्यवस्थापनाची पध्दत सन १८४६ मध्ये श्रीयुत गिबसन यांनी लिहीलेल्या कार्य आयोजनेपासून झाली. या कार्य आयोजनांमध्ये क्लिष्ट नैसर्गिक सभोवतालच्या परिस्थीतीकीची स्थिरता निश्चित करुन वन संसाधनाच्या अविरत लाभाबरोबरच लोकांच्या इमारती, इंधन, चारा व इतर गौण वनोपजांच्या मागण्यांची पूर्तता करण्याचा प्रयत्न करण्यांत येतो.

वनांच्या समृध्दिकरिता तसेच समाजाच्या गरजा पूर्ण करण्याकरिता विविध प्रजातींचे वनरोपन करण्यात येते. वनरोपनासाठी आवश्यक असलेले विविध प्रजातींची रोपे गरजेनुसार वनविभागाच्या अनेक रोपवाटीकेमध्ये तयार करण्यात येतात. त्याचप्रमाणे कार्य आयोजनांमध्ये नमूद केलेल्या उपचारांच्या अधीन राहून इमारती, जळावू लाकडे, फाटे इत्यादींचे प्रामुख्याने वन उत्पादन काढले जाते.

राज्यातील वनालगत भागात प्रामुख्याने आदीवासी लोकसंख्या असल्याने त्यांना रोजगार पुरविणे व वन समुपयोजनेच्या कामात त्यांना सहभागी करण्यासाठी राज्यात १९४७-४८ पासून जंगल कामगार सहकारी संस्था कार्यरत आहे.

या व्यतिरिक्त इतर अकाष्ठ वनोपज जसे, बांबू, गवत, गोंद व तेंदू पाने यांचे सुध्दा उत्पादन वनातून काढले जाते. वनौषधीसाठी सुध्दा नैसर्गिक वने हाच मोठा स्त्रोत आहे.

वनांच्या प्रभावी संरक्षणासाठी वन विषयक कायद्यांची अंमलबजावणी वन विभागाव्दारे करण्यांत येते. उदा. भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२,, वनसंवर्धन कायदा, १९८० ,वनसंवर्धन नियम २००३,इत्यादी.

राष्ट्रीय वन धोरण, १९८८ अन्वये वनक्षेत्राचा विकास करण्यासाठी व वनसंरक्षणामध्ये लोकांचा सहभाग अभिप्रेत आहे. यानुसार महाराष्ट्रात १९९२ पासून संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत आजमितीस राज्यातील १५५७६ वनालगतच्या गावांपैकी ५३२२ गावांमध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांची स्थापना वनसंरक्षण व वनसंवर्धनाच्या कामात सहभागी होण्यासाठी करण्यांत आली आहे.

वनसंरक्षणासोबत राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रमाची अंमलबजावणी वन विकास यंत्रणेच्या माध्यमातून संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांमार्फत करण्यांत येत आहे.

वनविषयक संशोधन , शिक्षण व प्रशिक्षणाकरिता राज्यातील विविध भागात वन संशोधन केन्द्र व प्रशिक्षण केंन्द्र कार्यरत आहेत. संशोधन केंन्द्रामार्फत नवीन प्रजातींच्या चाचण्या लागवड, नमूना भूखंड आणि संरक्षित भूखंडांची स्थापना व अभ्यास, बीज भूखंडांची स्थापना व सुधारणा , अधिक वृक्षांची निवड, बिजांपासून बीजोघान निर्मिती इत्यादी संशोधनाची कामे प्रामुख्याने केली जातात. तसेच वनरक्षक प्रशिक्षण केन्द्रे जालना व शहापूर येथे आहेत वनपाल प्रशिक्षण केन्द्र पाल येथे तर चिखलदरा व चंद्रपूर येथे वन क्षेत्रपाल प्रशिक्षण केन्द्रे आहेत.

महाराष्ट्र वन विभागाचे मुख्यालय नागपूर येथे आहे. वन विभागाचे प्रमुख प्रधान मुख्य वनसंरक्षक हे असून त्यांच्याकडे राज्यातील सबंध वानीकी व वन विभागाचे प्रशासन कामे सोपविण्यांत आले असून वन्यजीव हा विषय प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांच्याकडे वेगळयाने आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षक यांच्या प्रशासकीय मदतीला अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व मुख्य वनसंरक्षक हे आहेत.

महाराष्ट्र वन विभागाच्या संपूर्ण संरचनेत प्रधान मुख्य वनसंरक्षक-२, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक-३, मुख्य वनसंरक्षक-१३, वनसंरक्षक २५, उपवनसंरक्षक ६५, विभागीय वन अधिकारी ४६, सहायक वनसंरक्षक २१७, वनपरीक्षेत्र अधिकारी ७८९, वनपाल २५५३, वनरक्षक ८७७१ या संवर्गनिहाय पदांचा समावेश आहे.

संपर्कासाठी